## जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर
## तलाठी पदभरती - २०१९

# सूचना

महापरीक्षा पोर्टल (माहिती तंत्रज्ञान) यांच्या मार्फत नागपूर जिल्हयातील तलाठी पदाकरीता दिनांक २ जुलै, २०१९ ते दिनांक २६ जुलै, २०१९ या कालावधीत ऑनलाईन परीक्षा घेण्यात आलेली असून महापरीक्षा पोर्टल (माहिती तंत्रज्ञान) यांचेकडून उमेदवारांना मिळालेल्या गुणांची माहितीचे आधारे संबंधित उमेदवारांचे दाखले पडताळणी करीता प्रवर्गनिहाय **संभाव्य निवड यादी** (Provisional Select List) **व संभाव्य प्रतिक्षा यादी** (Provisional Waiting List) दिनांक २०.०९.२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती.

प्रसिध्द करण्यात **संभाव्य निवड यादीतील** (Provisional Select List) उमेदवारांनी तलाठी पदाच्या पात्रतेकरीता नमूद करण्यात आलेल्या शैक्षणिक अर्हतेची तसेच सामाजिक व समांतर आरक्षण लागू असल्यास सामाजिक व समांतर आरक्षणाची मूळ प्रमाणपत्र व सदर प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रतींचा १ संच तसेच ऑनलाईन अर्जाची डाऊनलोड केलेली प्रत घेवून **दिनांक १५.०१.२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता "आस्थापना शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर** येथे उपस्थित राहावे.

तसेच प्रसिध्द करण्यात **संभाव्य प्रतिक्षा यादीतील** (Provisional Waiting List) उमेदवारांनी तलाठी पदाच्या पात्रतेकरीता नमूद करण्यात आलेल्या शैक्षणिक अर्हतेची तसेच सामाजिक व समांतर आरक्षण लागू असल्यास सामाजिक व समांतर आरक्षणाची मूळ प्रमाणपत्र व सदर प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रतींचा १ संच तसेच ऑनलाईन अर्जाची डाऊनलोड केलेली प्रत घेवून **दिनांक १६.०१.२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता "आस्थापना शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय**, येथे उपस्थित राहावे.

मात्र उमेदवारांनी परीक्षा उत्तीर्ण केलेली असून गुणानुक्रमे कागदपत्र तपासणीकरीता बोलविण्यात आलेले असल्यामुळे उमेदवारास नियुक्ती संदर्भात कोणताही हक्क प्राप्त होणार नाही.

(मा. अध्यक्ष, जिल्हा निवड समिती
तथा जिल्हाधिकारी, नागपूर यांचे मान्यतेने)

(रविंद्र खजांजी)
निवासी उपजिल्हाधिकारी तथा
सदस्य सचिव जिल्हा निवड समिती
नागपूर